पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
प्रशासकीय इमारतीच्या दुरुस्ती खर्चास प्रशाकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पुलदे - २०१८/ प्र.क्र.२३/सांका.-२.
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८ मार्च, २०१८.

वाचा : प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र. पुलदे/४९२७, दि.२५.१.२०१८

प्रस्तावना :-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या प्रशासकीय इमारतीतील महिला व पुरुष स्वच्छतागृहांचे नुतनीकरण, वाहनतळाची दुरुस्ती तसेच वाहनतळामधील मलनि:सारण सुविधा सुस्थितीत करणे इ. कामे करुन घेणे आवश्यक आहे. याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व अकादमीच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे इमारतीची पाहणी केली असून त्यानुसार दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केला आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून त्यास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मान्यता दिली आहे तसेच प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांनी सहमती दिलेली आहे. अशा परिस्थितीत पु.ल.देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी येथील प्रशासकीय इमारतीतील महिला व पुरुष स्वच्छतागृहांचे नुतनीकरण, वाहनतळाची दुरुस्ती तसेच वाहनतळामधील मलनि:सारण सुविधा सुस्थितीत करणे इ. कामे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करुन घेण्याची व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या प्रशासकीय इमारतीतील महिला व पुरुष स्वच्छतागृहांचे नुतनीकरण, वाहनतळाची दुरुस्ती तसेच वाहनतळामधील मलनि:सारण सुविधा सुस्थितीत करणे इ. कामे करण्यासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मान्यतेने रु.४०४.७७ लक्ष चे अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननी अंती यामध्ये अंशत: दुरुस्ती करुन रु.४०९.२३ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास सहमती दिलेली आहे.

२. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीकडे २२०५ कला व संस्कृती (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (अनिवार्य) (२२०५ १४६३) २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.१६८.३२ लक्ष इतकी रक्कम शिल्लक आहे.

३. आता या शासन निर्णयान्वये पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या प्रशासकीय इमारतीतील महिला व पुरुष स्वच्छतागृहांचे नुतनीकरण, वाहनतळाची दुरुस्ती तसेच वाहनतळामधील मलनि:सारण सुविधा सुस्थितीत करणे इ. कामे करण्यासाठी रु.४०९.२३ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच या कामासाठी येणाऱ्या खर्चापैकी रु.१६८.२३ लक्ष इतक्या रक्कमेस वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव अंशदान स्वरुपात (Deposit Contribution work) ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.झेड डी-२, २२०५ कला व संस्कृती (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (अनिवार्य) (२२०५ १४६३) २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीतुन भागविण्यात यावा.

५. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी सदर निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव अंशदान स्वरुपात सूपुर्द करण्याची कार्यवाही करावी.

६. हा शासन निर्णय विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग २. दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उप विभाग ५ मधील अ.क्र. १०, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद १३४ नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे. यासंदर्भात विहित अटींचे पालन करण्यात यावे.

७. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने अनौ.सं.क्र.११६/इमा-३, दि.०७.०३.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२८१५२२५७३९२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2018.03.28 15:24:10 +05'30'

(अनिस शेख)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) सचिव, (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई.

६) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई.

७) अवर सचिव (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई.

९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

११) निवड नस्ती, सां.का.२.